सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाअंतर्गत लहान व मध्यम शहरांतील पायाभूत सुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) या उपअभियानाखाली अनुदान वितरण

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्र. युआयडी-२०११/प्रक्र-१०५/नवि-३३

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक : २९ मार्च, २०११

संदर्भ: शा.नि. क्र. एनयुआरएम-१००७/३५६/प्र.क्र.७२/०७/नवि-३३, दिनांक १६ जुलै, २००७

प्रस्तावना : नागरीकरणाचा वाढता वेग व व्याप्ती विचारात घेवून केंद्र शासनाने देशातील लहान व मध्यम शहरांमध्ये पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जाहिर करण्यात आलेल्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानाचे उपअभियान लहान व मध्यम शहरांसाठी पायाभूत सोयीसुविधांचा विकास कार्यक्रम (UIDSSMT) अंतर्गत महाराष्ट्रातील महानगरपालिका/नगरपरिषदा यांचे शहर विकास आराखडे (CDPs) व सविस्तर प्रकल्प अहवाल (DPRs) महाराष्ट्राच्या राज्यस्तरीय मंजुरी समितीच्या मान्यतेने केंद्र शासनास सादर करण्यात आले होते. केंद्र शासनाने उक्त योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील महानगरपालिका/ नगरपरिषदेच्या सादर प्रकल्पांना मंजुरी देवून निधी वितरीत केला आहे.

उक्त योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रकल्प किमतीपैकी केंद्र शासन, राज्य शासन व महानगरपालिका/नगरपालिका यांच्या हिश्याचा मंजूर आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

UIDSSMT अंतर्गत मंजूर प्रकल्पाची एकुण किंमत	केंद्र शासनाचा हिस्सा	राज्य शासनाचा हिस्सा	महानगरपालिका/ नगरपालिकांचा हिस्सा
१००	(८० %)	(१० %)	(१० %)

या योजनेअंतर्गत केंद्रीय निधी प्राप्त होण्यासाठी केंद्र शासनासोबत राज्य शासन व महानगरपालिका/ नगरपालिकांनी सक्तीच्या व वैकल्पिक सुधारणा क्षेत्रांत प्रगती करण्याबाबत करारनामा केला आहे. हा करारनामा झाल्यानंतर केंद्र शासनाव्दारे महानगरपालिका/ नगरपालिकांना केंद्र शासनाच्या हिश्याचा हप्ता वितरीत केलेला आहे. तथापि राज्य शासनाच्या हिश्याची रक्कम वितरीत करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : केंद्र शासनाची वितरीत रक्कम व वित्तीय आकृतीबंधानुसार खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे राज्य शासनाच्या हिश्याचा निधी वितरीत करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

(रु. कोटीत)

अ.क्र.	नागरी संस्था	प्रकल्प	राज्य शासनाचा वितरित करावयाचा हप्ता	राज्य शासनाने वितरीत करावयाच्या हिस्याची रक्कम
१	लातूर	गोलाईचे सौदर्यीकरण	दुसरा	०.०३
२	लातूर	पथदुभाजक व फुटपाथ	दुसरा	०.४४

[illegible]	पाणीपुरवठा योजना	दुसरा	२.३
[illegible]	पाणीपुरवठा योजना	दुसरा	१.१६
[illegible]	पाणीपुरवठा योजना	दुसरा	०.२
[illegible]	पाणीपुरवठा योजना	दुसरा	१.८५
		एकूण	६.३८

[illegible] संचालक तथा आयुक्त , नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना **"नियंत्रण [illegible]"** म्हणून घोषित करण्यात येत आहे व सहाय्यक संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, [illegible] मुंबई यांना **"आहरण व संवितरण अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत आहे. अधिदान व [illegible], मुंबई यांनी **अनुदान रु. ६,९८,००,०००/- (रुपये सहा कोटी, अठ्ठ्याण्णव लाख, फक्त)** [illegible] आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई ([illegible] Commissioner & Director of Municipal Administration, Mumbai) या नावे [illegible] सदर रकमेचे वितरण संबंधित महानगरपालिका/नगरपरिषदांना तात्काळ करावे.

[illegible] प्रस्तुत योजनेअंतर्गत सर्व प्रकल्पांची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर या योजनेमधून काय [illegible] याबाबतचा अहवाल सदर महानगरपालिका/ नगरपरिषदांनी राज्य शासन व केंद्र शासनास [illegible].

[illegible] सदर नगरपरिषद/ महानगरपालिकेस देण्यात येणाऱ्या **अनुदान रु. ६,९८,००,०००/-** (रुपये सहा कोटी, अठ्ठ्याण्णव लाख, फक्त) इतक्या रकमेचा खर्च हा मागणी क्र. एफ-२, [illegible] [illegible] विकास, ८०-सर्वसाधारण, १९१- महानगरपालिकांना सहाय्य (००) (५४) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियाना अंतर्गत महानगरपालिकांना नगर-विकासाकरीता सहाय्य (राज्य हिस्सा) [illegible] ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली सन २०१०-२०११ या आर्थिक [illegible] तरतुदीतून भागविण्यात यावा.

[illegible] सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक : ३५८/११/अर्थ-१६ दिनांक २४/०३/२०११ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स. वि. कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

[illegible]

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ , मुंबई
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- २ , नागपूर

[illegible] ISSUE GR 105-11 STATE SHARE UIDSSMT 7+6 ULBs

३) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई

४) अधिदान व लेखाधिकारी, (फोर्ट) मुंबई

५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.

६) प्रधान सचिव, वित्त / प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

७) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-३० तथा नोडल एजन्सी

८) संबंधित आयुक्त /मुख्याधिकारी, महानगरपालिका / नगरपरिषदा.

९) सह सचिव (नवि-४) नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई

१०) कक्ष अधिकारी (नवि-५) रोखशाखा, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

११) निवडनस्ती (नवि-३३).